शिक्षणमहर्षी बापूसाहेब लाखनीकर

शीलं परं भूषणम्

॥शीलं परम् भूषणम् ॥

राष्ट्रीय शिक्षण संस्था लाखनी द्वारा संचालित

# समर्थ महाविद्यालय, लाखनी जिल्हा-भंडारा

द्वारा आयोजित

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर आणि गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

रा.तु.म. नागपूर विद्यापीठ आणि गोंडवाना विद्यापीठ मराठी प्राध्यापक परिषद

# मराठी प्राध्यापक परिषदेचे ३५ वे अधिवेशन

## प्रमाणपत्र

प्रा.डॉ./श्री./श्रीमती/कु. प्रा. सुनिता भारत धोरबोले यांना

प्रमाणित करण्यात येत आहे की, दिनांक १७ व १८ जानेवारी २०२५ रोजी संपन्न झालेल्या राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर आणि गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली मराठी प्राध्यापक परिषदेच्या ३५व्या अधिवेशनात मराठी जनांना येतील आता सुगीचे दिवस या विषयावर शोधनिबंध सादर केला. आपण सत्राध्यक्ष/वक्ता/सूत्रसंचालक/निबंधवाचक/प्रतिनिधी म्हणून सक्रिय सहभाग घेतला, या करिता हे प्रमाणपत्र देण्यात येत आहे.

| डॉ. अजय चिकाटे | डॉ. गणेश मोहोड | डॉ. बंडू चौधरी | डॉ. दिगांबर कापसे |
|---|---|---|---|
| अधिवेशनाध्यक्ष<br>मराठी प्राध्यापक परिषद<br>३५वे अधिवेशन | अध्यक्ष<br>मराठी प्राध्यापक परिषद | संयोजक<br>मराठी प्राध्यापक परिषद<br>३५वे अधिवेशन | प्राचार्य<br>समर्थ महाविद्यालय, लाखनी |

# विद्यावार्ता®

MAH/MUL/03051/2012
ISSN-2319 9318

Peer Reviewed International Refereed Research Journal

शीलं परं भूषणम्

॥ शीलं परम् भूषणम् ॥

राष्ट्रीय शिक्षण संस्था लाखनी द्वारा संचलित

## समर्थ महाविद्यालय, लाखनी

जिल्हा भंडारा

राष्टसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर
व गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

### मराठी प्राध्यापक परिषद 35 वे अधिवेशन

# " अभिजात मराठी "

विशेषांक २०२५



MAH/MUL/ 03051/2012 ISSN :2319 9318

आंतरविद्याशाखीय बहुभाषिक शोध पत्रिका

# विद्यावार्ता™

**Jan. To Mar. 2025**
**Special Issue**

**Date of Publication**
**27 Feb. 2025**

**Editor**
**Dr. Bapu g. Gholap**
(M.A.Mar.& Pol.Sci.,B.Ed.Ph.D.NET.)

tingare

56) मराठी जनांना येतील आता सुगीचे दिवस
प्रा. सुनिता भारत थोरबोले, रामानंदनगर बुर्ली, सांगली

❖ **विद्यावार्ता** या आंतरविद्याशाखीय बहुभाषिक त्रैमासिकात व्यक्त झालेल्या मतांशी मालक, प्रकाशक, मुद्रक, संपादक सहमत असतीलच असे नाही. **न्यायक्षेत्र:बीड**

"Printed by: **Harshwardhan Publication Pvt.Ltd.** Published by **Ghodke Archana Rajendra** & Printed & published at Harshwardhan Publication Pvt.Ltd.,At.Post. Limbaganesh Dist,Beed -431122 (Maharashtra) and Editor **Dr. Gholap Bapu Ganpat**.

Reg.No.U74120 MH2013 PTC 251205
Harshwardhan Publication Pvt.Ltd.
At.Post.Limbaganesh,Tq.Dist.Beed
Pin-431126 (Maharashtra) Cell:07588057695,09850203295
harshwardhanpubli@gmail.com, vidyawarta@gmail.com
All Types Educational & Reference Book Publisher & Distributors / www.vidyawarta.com

# INDEX

01) मराठी भाषा–साहित्य–संस्कृती : प्राचीन आणि अभिजात
राजेंद्र गोविंदराव नाईकवाडे, नागपूर ||26

02) भारतीय भाषेच्या परिप्रेक्षात अभिजात मराठी भाषेचे स्थान आणि योगदान
डॉ. कोमल वि. ठाकरे, महादुला कोराडी ||29

03) मराठी भाषाशुद्धी चळवळीचे पाईक – स्वातंत्र्यवीर सावरकर
डॉ. दिगांबर दत्तात्रय कापसे, लाखनी, जि. भंडारा ||35

04) अभिजात मराठीची वाटचाल
डॉ. निलीमा दिगंबर कापसे, लाखनी, जि. भंडारा ||38

05) मराठी भाषेचे अभिजातपण टिकवण्यासाठी आम्हास काय करता येईल?
प्रा. डॉ. विजय रैवतकर, आरमोरी, जि. गडचिरोली ||41

06) अभिजात मराठी आणि करिअरच्या संधी
डॉ. हेमंत महादेवराव देशमुख, भंडारा ||46

07) अभिजात मराठी मातीचा गंध जागतिक पटलावर नेताना निर्माण होणारी आव्हाने....
प्रा. डॉ. सुरेश दयाराम खोब्रागडे, श्रीनगर, मुरमाडी/सावरी, जि. भंडारा ||48

08) मराठी भाषेचे अभिजातपण इतिहास भवितव्य आणि भूमिका
प्रा. डॉ. गणेश एन. चुदरी, धानोरा ||53

09) मराठी भाषा 'अभिजात दर्जा' ने काय बदलणार!
डॉ. पुरुषोत्तम गुणवंतराव पखाले, नरखेड, जि. नागपूर ||57

10) अभिजात मराठी व बोली यांचा सहसंबंध
डॉ. अमृता डोर्लीकर, नागपूर ||60

11) अभिजात मराठीचा इतिहास
डॉ. शरद जे. मेश्राम, अर्जुनी मोरगाव जि. गोंदिया ||64

12) अभिजात मराठीची वाटचाल
प्रा. डॉ पुरुषोत्तम आर. नंदेश्वर, सानगडी ||68

52) सत्यमेव जयते
**सौ. लता पांडुरंग हिवरकर, नागपूर** ||212

53) मनोहर तल्हार यांच्या कथा वाङ्मयातील स्त्री व्यक्तिरेखा
**कु. अश्विनी राजेंद्र सातपुडके, डॉ. गणेश भीमराव मोहोड, कारंजा (घा.)** ||215

54) ज्योत्सना देवधर यांचे कथालेखन : सामाजिक अनुभूती
**वेखंडे रेश्मा पुरूषोत्तम, प्रा. डॉ. राकेश देवरावजी कभे** ||219

55) मराठी भाषेचे अभिजातीकरण आणि सामाजीकरण
**डॉ. संध्या उदयभान शेंडे, साकोली** ||223

56) मराठी जनांना येतील आता सुगीचे दिवस
**प्रा. सुनिता भारत थोरबोले, रामानंदनगर बुर्ली, सांगली** ||225

57) स्त्रीवादी कथालेखन : एक दृष्टिक्षेप
**राजेश्वरी राजु लव्हात्रे (सांगोळकर), डॉ. राकेश देवरावजी कभे, पारशिवनी** ||230

www.vidyawarta.com/01 http://www.printingarea.blogspot.com

भाषा म्हणून मराठीचे स्थान महत्त्वाचे होते. नंतर प्रांतरचना झाल्यावरनंतर प्रांतरचना झाल्यावर ती महाराष्ट्रापुरती मर्यादित झालेली भाषा आहे. मात्र हात भाषेचे अभिजात करणन झाले असल्यामुळे आज मराठी भाषेच्या कार्यकर्तृत्वात कृतिशीलता जाणू लागली आहे. म्हणजेच भाषा ही आपापल्या समाजाने दिलेल्या अमूल्य सांस्कृतिक संचित आहे. म्हणूनच मराठी भाषा ही सतत बोलणारी असायला हवी. त्यासाठी ती संप्रेषण व्यवहार, ज्ञान निर्मिती, साहित्य निर्मिती, शिक्षण माध्यमे मनोरंजन, उद्योग, व्यवहार आणि व्यवसाय, आणि जागतिकीकरणात विविध क्षेत्रात भाषेनंतरचे उपयोगी भाषा मराठी भाषा ठरणार आहे. आज मराठी भाषेचे अभिजात करून झाल्यामुळे अनेक क्षेत्रात मराठीचे महत्त्व वाढले. म्हणूनच अभिजातीकीकरण झालेली मराठी भाषा ही मानवी समवेदशील व्यवहारासाठी व त्याच्या सामाजीकरणासाठी अस्तित्वात आलेली भाष ठरते.

**निष्कर्ष**

- मराठीच्या बोली चा अभ्यास संशोधन साहित्य संग्रह करण्यात येईल.
- देशाच्या सर्व विद्यापीठांमध्ये मराठी शिकवण्याची सोय असेल.
- प्राचीन ग्रंथ मराठीत अनुवादित करण्यात येतील.
- अभिजात भाषेमुळे नोकरीत मिळणाऱ्या नवनवीन संधी मिळेल.
- शिक्षण क्षेत्रात, मराठी भाषेचा, एक मुख्य भाषा म्हणून अभ्यासणात, येईल.
- मराठी भाषेचा वारसा नव्या पिढीला एक मुख्य भाषा म्हणून मिळणार.
- केवळ शाळात नाहीत तर पदवी नंतरही मराठी भाषेत शिक्षण पूर्ण करता येईल.
- संशोधनास एक नवा अभ्यासक्रम मिळेल.

**संदर्भ**

१) व्यवहारिक मराठी ल . रा. नासीराबादकर
२) महाराष्ट्र आणि मराठी भाषा डॉ. ग ना . जोगळेकर
३) अभिजात मराठी भाषा समिती
४) मराठी विश्वकोश

**56**

# मराठी जनांना येतील आता सुगीचे दिवस

**प्रा. सुनिता भारत थोरबोले**
डॉ. पतंगराव कदम महाविद्यालय,
रामानंदनगर बुर्ली सांगली

************

**प्रस्तावना –**

महाराष्ट्रामध्ये मराठी भाषेला आईचा दर्जा दिला जातो. इथल्या साहित्यिकांनी तर मराठीची अमृताशी तुलना केली आहे. अशा या आपल्या मराठी भाषेला ३ ऑक्टोबर २०२४ या दिवशी अभिजात भाषेचा दर्जा देण्यात आला. हा दर्जा द्यायला केंद्र शासनाने तसा उशीरच केला.

भाषेला अभिजात दर्जा केंद्र सरकारकडून प्राप्त झाल्यावर तिचा विकास–संवर्धन–अभिवृद्धी यासाठी राज्य सरकारला दरवर्षी तीनशे ते पाचशे कोटी रुपयांचे अनुदान मिळते. महाराष्ट्र सरकारने मराठीसाठी अभिजाततेचा दावा केंद्र सरकारकडे (२०१२–१३) करून, अटी सिध्द करण्याचे काम केले. ते काम साहित्यिक संशोधकांच्या एका अभ्यास समितीने पूर्ण केले.

मराठी भाषा बोलणाऱ्यांची संख्या जगात नऊ कोटी इतकी असून ती जगातील दहाव्या क्रमांकाची भाषा समजली जाते. भारतात सहा भाषांना अभिजाततेचा दर्जा मिळालेला होता. तमिळ (२००४), संस्कृत (२००५), कन्नड (२००८), तेलगू (२००८), मल्याळम (२०१३) व उडिया (२०१४).

मराठी भाषेने २०१३ साली केंद्र शासनाकडे प्रस्ताव सादर केल्यानंतर अकरा वर्षांनी मराठीला तो दर्जा प्राप्त झाला आहे. मराठी सोबत अजून चार भाषांना तो दर्जा ३ ऑक्टोबर २०२४ या दिवशी मिळाला.

भारताच्या राज्यघटनेने मान्यता दिलेल्या बावीस भाषांपैकी अकरा म्हणजे अर्ध्या भाषा आता अभिजात ठरल्या आहेत.

**विषयाची ओळख —**

अमृताची गोडी असलेल्या मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाला आहे. त्या अनुषंगाने मराठी भाषिक म्हणवल्या जाणाऱ्या मराठी जनांना आता नोकरीच्या संधी नक्कीच उपलब्ध होतील अशी आशा करायला हरकत नाही.

जिथे काम तिथे दाम आणि जर मिळाला दाम तर नक्कीच उघडतील प्रगतीची दारे.

मराठी अभिजात झाली म्हणजे नेमकं काय झाल?

केंद्रीय संस्कृती मंत्रालयाकडून भाषा अभिजात ठरवण्यासाठी प्रमुख चार निकष निश्चित करण्यात आले आहेत.

१. भाषेची प्राचीनता दीड ते दोन हजार वर्षे जुनी असावी.

२. भाषेची मौलिकता आणि सलगता दिसून यावी.

३. भाषिक आणि वाङ्मयीन परंपरेचे स्वयंभूषण म्हणजेच भाषेत अभिजात ग्रंथ असावेत.

४. प्राचीन भाषा व तिचे आधुनिक रूप यांची सांगड दिसायला हवी.

म्हणजेच प्राचीन भाषेचे संदर्भ आणि आजची भाषा एकच आहे असे सिद्ध करण्यासाठी त्यात संबंध ओढून ताणून आणलेला नसावा. या सगळ्या कसोट्या पार करून मराठीने अभिजाततेचा दर्जा प्राप्त केला आहे. मराठीचा भाषिक प्रवास प्राचीन महारठ्ठी भाषा, मरहट्टी, महाराष्ट्री, प्राकृत, अपभ्रंश मराठी, आजची मराठी असा झाला आहे. या भाषा वेगवेगळ्या नसून ती रूपे मराठी या एकाच भाषेची आहेत, असे ल. रा. पांगारकर यांनी सोदाहरण दाखवून दिले आहे. लीळाचरित्र, ज्ञानेश्वरी, विवेकसिंधू हे मराठीतील आद्य ग्रंथ नव्हेत तर ते मराठी प्रगल्भ व श्रीमंत झाल्यानंतरचे श्रेष्ठ ग्रंथ आहेत. ते ग्रंथ आठशे वर्षांपूर्वी ज्या मराठी भाषेत लिहिले गेले ती त्याच्या आधी किमान चौदाशे वर्षे समृद्ध भाषा होती याचे शिलालेख, ताम्रपट, पोथ्या आणि हस्तलिखित ग्रंथ असे पुरावे उपलब्ध झाले आहेत. मराठीत उपलब्ध असलेला आणि दोन हजार वर्षे जुना असलेला ग्रंथ म्हणजे 'गाथासप्तशती' होय.

**विविध क्षेत्रे आणि नोकरीच्या संधी —**

आपण भारत देशात राहतो. भारताचं नागरिकत्त्व आपण स्वीकारलं आहे. ही आपल्यासाठी अभिमानाची गोष्ट आहेच परंतू, महाराष्ट्र राज्याच्या अनुषंगाने आपल्या राज्य शासनाने काही बदल करायला हवेत. तरच मराठी माणसांना नोकरीच्या संधी उपलब्ध होतील.

आपली मातृभाषा खूप महत्त्वाची आहे याची जाणीव अगोदर समाजाला व्हायला हवी. तरच मराठी टिकेल. नाहीतर सोन्याचे पारंपारिक दागिने नको तर बेन्टेक्स ज्वेलरी हवी म्हणणाऱ्या सुनेसारखी मराठी जनांची अवस्था होईल.

**शिक्षण**

आपल्याजवळ जे आहे त्याचं माणसाला कधीच मोल नसतं. पण, एखादी गोष्ट आपल्याजवळ नसेल आणि दुसऱ्याजवळ असेल तर त्या गोष्टीबद्दल मात्र कमालीचं आकर्षण असतं. हा मनुष्य स्वभाव आपल्या मातृभाषेच्या बाबतीत अगदी तंतोतंत लागू पडतो. आपली भाषा कितीतरी पटीने खूप चांगली आहे. पण, तीला महत्त्व न देता परकीय भाषा म्हणजेच इंग्रजीबद्दल मात्र कमालीचं आकर्षण वाटतं आणि म्हणूनच मागच्या काही वर्षांचा अभ्यास केला असता असे आढळून आले की,मागच्या दहा वर्षात चौदा हजारांच्या आसपास मराठी शाळा बंद पडल्या आहेत. पैकी काही विकण्यासही सुरुवात झाली आहे.

याला जबाबदार फक्त शासनच नाही तर, समाजाची विचारसरणीही आहेच. आज नव्वद टक्के सुशिक्षित पालक आपला पाल्य इंग्लिश मिडीयमच्या शाळेत घालत आहेत. त्याचाच हा परिणाम म्हणावा लागेल.

या संदर्भात खूप सुंदर अशी पोस्ट वाचनात आली. ती अशी —

एका पालकाची मुलाला पहिलीच्या वर्गात टाकताना सुचलेली अफलातून कल्पना ह्या कल्पनेला शंभर तोफांची सलामी. १०० % विचार करायला लावणारी ही गोष्ट ! ज्यांचा मुलगा किंवा मुलगी २०२४ मध्ये पहिलीला जाणार त्यांच्यासाठी खूप महत्त्वाची माहिती.

मित्रांनो, माझं नाव सचिन धोंडीराम धनवटे राहणार नाशिक. माझी मुलगी मनस्वी सचिन धनवटे हिच्यासाठी मी पहिलीला एडमिशन घेण्यासाठी पुण्यात

बऱ्याच जागी फीस विचारली तर ४०,००० पासून एक लाखापर्यंत आहे. नर्सरी ते यु के जी साठी सुद्धा सारखीच आहे.

मग मला एक आयडिया सुचली की, जर मुलांच्या शिक्षणासाठीच आज वर्षाला एवढे पैसे खर्च करायचे तरीही नोकरीची हमी असेल का नाही? तर नाही, शिवाय इतर अडचणी आहेतच. मग मला वाटतं जर प्रत्येक वर्षी त्याला लागणारी फी रिलायन्स, टाटा, मारुती सुझुकी, हिंदुस्तान युनिलिव्हर, इन्फोसिस, अदानी, बजाज यासारख्या जगप्रसिध्द कंपनींचे शेअर्स प्रत्येक वर्षी घ लाखाचे घेतले आणि मुलीला जिल्हा परिषदच्या शाळेत घातले तर जर मुलगा कर्तृत्ववान असेल तर स्वतःची प्रगती करेलच कारण कॉनव्हेंट मध्ये फी भरूनही तो कर्तृत्ववान होईलच अशी खात्री देणारी शाळा अजूनतरी या जगात उपलब्ध नाही म्हणून ही फी कॉनव्हेंट मध्ये न भरता मुलगा पहिलीच्या वर्गाला असताना १ लाख, २ रीला १ लाख, ३ रीला १ लाख असे करत करत १५ वीला त्याचे शेअर्स १५ लाख रुपयाचे असतील, आणि पहिल्या वर्गात घेतलेल्या शेअर्सची किंमत १५ वीला म्हणजेच १५ वर्षांनी कमीत कमी रुपये १ कोटी असेल असे त्याच्या नावे १५ शेअर्स असतील आणि जर आपण मागील १५ वर्षात वरील कंपनीच्या शेअर्सची किंमत पहिली तर माझ्या मुलाकडे १५ वीला पंधरा वर्षात एकूण रक्कम असेल कमीतकमी १ कोटी जास्तीत जास्त १५ कोटी.

मला अशी कल्पना सुचली जर कोणी यावर्षी मुलांना फर्स्टला घालणार असेल तर त्याला पहिलीला घाला यामुळे जिल्हा परिषद/सरकारी शाळाही वाचतील. मातृभाषेतून शिक्षणही मिळेल, शिक्षण सम्राटांना आळा बसेल, फोफावलेला भ्रष्टाचारही कमी होईल आणि एका बापाची आयुष्याची कमाई सुद्धा वाचेल आणि मुलाला शिक्षण पूर्ण झाल्यावर कोण्या कंपनीत किंवा नोकर म्हणून चाकरी करायची गरज पडणार नाही तोच इतरांना रोजगार देवू शकेल. विचार करा सर्वांनी.

खरच तर आहे या सुज्ञ पालकांना मला एक गोष्ट आवर्जून सांगावीशी वाटते की, त्याचं शिक्षण मराठी माध्यमाच्या शाळेतच झालं आहे आणि तेही यशस्वी झालेलेच आहेत, तर मुलाला इंग्रजी माध्यमाच्या शाळेत घालण्याचा अट्टाहास का?

आज जर आपण विचार केला तर मोठ मोठे आय. पी. एस. ऑफिसर, तसेच उच्च पदावर काम करणाऱ्या नव्वद ते पंच्याण्णव टक्के व्यक्तींचं शिक्षण हे मराठी माध्यमाच्या शाळेतच झालेलं असतं.

मग इंग्लिश मिडीयमच्या शाळेतच मुलाची प्रगती होते हा अट्टाहास धरण चुकीचा नाही का?

यामध्ये अजून एक दुर्दैव असं की केंद्राच्या काही शाळांमध्ये आजही मराठी विषय शिकवलाच जात नाही. इतर राज्यांमध्ये हे ठीक आहे परंतु, महाराष्ट्रामध्ये असं होता कामा नये. केंद्रीय विद्यालय संगठनमध्ये महाराष्ट्रात मराठी विषय ठेवलाच पाहिजे. तसेच काही सैनिकी शाळांमध्येही मराठी विषय असायलाच हवा. हा बदल महाराष्ट्रात शासनाने करायला हवा. तरच मराठीचे महत्त्व वाढेल. कारण मुलांना आईवडील इंग्रजी बोलायला शिकवतात आणि ते कौतुकानं इतरांना सांगतात. याचा परिणाम असा होईल की, उद्याच्या पिढीला इंग्रजी शब्द ठावूक असेल पण त्याला मराठीत काय म्हणतात ते मात्र सांगता येणार नाही. आणि हे खूप भयंकर असेल.

**वृत्तपत्र**

वृत्तपत्र क्षेत्रामध्ये विशेषतः मराठी दैनिक वृत्तपत्रांमध्ये मराठी तरुण तरुणींना नक्कीच संधी उपलब्ध आहेत. संपादक, उपसंपादक, मुद्रितशोधक, कॉम्पुटर ऑपरेटर, वार्ताहर, लिपिक अशा बऱ्याच पदांवरती मराठी माणसाला नोकरीची संधी उपलब्ध होऊ शकते.

त्यासाठी मराठी माणसांनी मराठी वृत्तपत्र वाचनाचा आग्रह मात्र धरायलां हवा.

**प्रकाशन क्षेत्र**

या क्षेत्रामध्ये लेखक, संपादक, मुद्रित शोधक, दुभाषा, भाषांतरकार, डेस्कटॉप पब्लिशर, प्रकाशक, अकाऊंटंट अशा व इतर जागांवरती मराठी व्यक्तीची नेमणूक करता येते.

त्यासाठी मराठी साहित्य वाचनाची गोडी जास्त लोकांना लागायला हवी. तसेच स्पर्धा परीक्षांमध्ये प्रकाशित होणारी पुस्तके प्रकाशित करत असताना ती हिंदी व इंग्रजी अशा दोन भाषांमध्ये असतात तशीच

ती मराठी भाषेतही असायला हवीत.

**विमा क्षेत्र**

यामध्ये विमा एजंट,विकास अधिकारी,तक्रार निवारण अधिकारी, लिपिक, कॉम्पुटर ऑपरेटर, कॅशिअर, इत्यादी ठिकाणी नोकरीच्या संधी उपलब्ध होतात.

बोलणाऱ्याचे गहू खपतात आणि न बोलणाऱ्याचं सोनही तसाच पडून राहत. त्याप्रमाणे जर तुम्हाला उत्कृष्ट मराठी बोलता येत असेल तर विमा एजंट या व्यवसायाने तुम्ही खूप पैसे कमवू शकता. फक्त लोकांना विमा विकत घेण्यासंदर्भात पटवून द्यावं लागतं.

आता या क्षेत्रात कॉम्पुटरचा वापर वाढला आहे. नवीन धोरणानुसार तुम्हाला कागदावर फॉर्म भरण्याऐवजी ऑनलाईन फॉर्म भरावा लागतो. त्याचं आनंदा नावच एक सोफ्टवेअर आहे. तसच मराठी मधून फॉर्म भरता येणार सोफ्टवेअर शोधायला हवं. कारण आता मराठी भाषा अभिजात झालेली आहे.

**बँकिंग क्षेत्र**

कॅशिअर, मेनेजर, ऑफिस असिस्टंट, कॉम्पुटर ऑपरेटर, सहाय्यक, वरिष्ट लिपिक, कनिष्ट लिपिक, शिपाई या व अशा अनेक क्षेत्रांमध्ये नोकरीच्या संधी उपलब्ध आहेत.

मात्र इथेही मराठी भाषेच्या सोफ्टवेअरचा अभाव दिसून येतो. काही बँकांमध्ये कार्यालयाची भाषा इंग्रजी असते. महाराष्ट्रामध्ये बँकिंग क्षेत्रातील कार्यालयाची भाषा मराठीच असायला हवी, तरच यामध्ये मराठी तरुणांचा सहभाग वाढेल.

**न्यायक्षेत्र**

पूर्वीच्या काळी गावातील पंच न्यायदानाचे काम करीत असत. आता न्यायदानाचे काम केंद्रशासनाच्या अखत्यारीत येते. पंचांच्या अगोदर राजा न्याय देण्याचे काम करीत असायचा. राजाकडून योग्य न्यायदान होत नसेल तर ती प्रजा त्रासून जायची. पण इतिहास साक्षीदार आहे तो शिवरायांच्या न्यायनिवाड्यासाठी. स्त्रियांवर अत्याचार करणाऱ्याचा रायगडाच्या टकमक टोकावरून कडेलोट केला जायचा,जशी शिक्षा तसा न्याय दिला जात होता. त्यामुळे लोक गुन्हा करायला घाबरत होते.

आता न्यायदानाच्या संकल्पना बदलल्या आहेत. न्यायालयात लिपिक, टंकलेखक, कारकून, वकील, न्यायाधीश या व अशा इतर जागांवर नोकरीच्या संधी असतात.

न्यायाक्षेत्रामध्ये कागदोपत्री व्यवहार हा हिंदी, इंग्रजी भाषेत होत असतो, तो मराठी भाषेत व्हायला हवा. तरच मराठी भाषेतून वकील, न्यायाधीश होणाऱ्यांचे प्रमाण वाढेल.

**प्रशासन**

प्रशासनाच्या कारभाराची भाषा मराठीच असायला हवी. यासंदर्भात राजर्षी शाहू महाराज अत्यंत आग्रही होते. लोकांना राज्यकारभाराची भाषा कळायला हवी, ते स्वतःही त्याच भाषेत बोलत असत.

यात जमेची बाजू म्हणजे महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत ज्या परीक्षांचे आयोजन केले जाते त्यामध्ये मराठीला वेटेज जास्त दिल गेलं आहे आणि ते द्यायलाच हवं. फक्त त्या परीक्षेच्या मुलाखती घेताना इंग्रजीचा अट्टाहास धरता कामा नये. केंद्रीय लोकसेवा आयोगामध्ये मुलाखती इंग्रजीमधून घेतल्या जातात. त्यामध्ये मराठी उमेदवारांना मराठीतून मुलाखत देण्याची मुभा द्यायला हवी. तरच मराठी मुलांचा केंद्र शासनाच्या नोकरीत टक्का वाढेल.

अजून आरक्षणाचा खूप मोठा प्रश्न सतावत आहेच. या आरक्षणामुळे गुणवत्ताधारक मराठी तरुण स्पर्धेतून बाहेर पडत आहेत. जे खरोखर परिस्थितीतून शिकले आहेत त्यांना काही मार्कांसाठी नोकरीला मुकावे लागत आहे. ही परिस्थिती कुठेतरी बदलायला हवी. सगळ्यात जास्त भ्रष्टाचार सरकारी नोकऱ्यामध्ये केला जात असतो.

ऐंशी टक्के विद्यार्थी परीक्षेमार्फत भरले जातात आणि उरलेले टेबलाखालून पैसे देवून भरले जातात. ही परिस्थितीही बदलायला हवी. काही मुल तर एज बार होतात तरी त्यांनासरकारी नोकरी मिळत नाही, मग ते आत्महत्येसारखा पर्याय स्वीकारतात किंवा डिप्रेशनमध्ये जातात. काहीजण दारूसारख्या व्यसनाच्या आहारी जातात. महाराष्ट्रामध्ये राहूनच मराठी तरुणांची अशी अवस्था होते.

**प्रशासनात नोकरीची वेगवेगळी क्षेत्रे येतात –**

१. संरक्षण विभाग – शिपाई, नायक, हवालदार,

इन्स्पेक्टर व वरिष्ठ अधिकारी, सैनिक, पायलट इत्यादी.

२. शिक्षण विभाग —अंगणवाडी सेविका, शिक्षक, प्राध्यापक व इतर

३. महसूल विभाग — तलाठी, ग्रामसेवक, सरपंच, तहसीलदार, नायब तहसीलदार,

४. प्रशासकीय विभाग — जिल्हा परिषदेत काम करणारे सर्व कर्मचारी, मंत्रालयातील कर्मचारी, विभागीय कार्यालयातील कर्मचारी

५. परिवहन विभाग — बस चालक, वाहक, वाहतूक निरीक्षक, रेल्वे खात्यात काम करणारे सर्व कर्मचारी.

६. आरोग्य विभाग — डॉक्टर, परिचारिका, मदतनीस, दवाखान्यात काम करणारे कर्मचारी.

अशाप्रकारे प्रशासनात नोकरीच्या संधी उपलब्ध आहेत. यामध्ये डॉक्टर होण्यासाठी इंगजी भाषा येणे आवश्यक असते. परंतु आपण जर आयुर्वेदाचा आधार घेतला तर मराठीतले बरेचसे शब्द त्यामध्ये सापडतील.

अशाप्रकारे वेगवेगळ्या क्षेत्रांमध्ये नोकरीच्या संधी उपलब्ध असतात. त्याचबरोबर जे विद्यार्थी पदवीला मराठी विषय ठेवतील त्यांच्यासाठी पुढील संधी उपलब्ध होतील.

- निवेदक
- मुद्रित तपासनीस
- वकील
- जनसंपर्क अधिकारी
- सूत्रसंचालक
- प्राध्यापक
- पत्रकार
- लेखक, वक्ता
- पटकथा लेखक
- संवादकार, गीतकार
- भाषा विषयतज्ञ
- दुभाषी / भाषांतरकार
- समीक्षक
- रिसेप्शनिस्ट
- शोधनिबंध लेखक
- अभिनेता / अभिनेत्री

अशा अनेक संधी भारतात आणि भारताबाहेर आहेत.

**निष्कर्ष —**

अमृताची गोडी असलेल्या या मायमराठीच्या छत्रछायेखाली आपण रहात असताना तिचे उपकार विसरता कामा नये. स्टार प्रवाह या टी. व्ही. चेनेल वर एक लाईव्ह शो लागतो त्याचं नाव आता होऊदे धिंगाणा या मालिकेचं सूत्रसंचालन सिद्धार्थ जाधव हा अभिनेता करतो. त्यावेळी जर्मनीची एमिली नावाची अभिनेत्री त्या शो मध्ये येत असते ती मराठी शिकण्यासाठी त्या शो मध्ये येते. तेव्हा आपल्याला अप्रूप वाटतं आणि आपल्या मुलाला मात्र आपण इंग्रजी बोलायलाच शिकलं पाहिजे याचा अट्टाहास धरतो. समाजाची ही मानसिकता बदलायला हवी.

शासनानेही मराठीच महत्त्व ओळखायला हवं आणि योग्य ते बदल वेळीच करायला हवेत. तरच मराठीला अभिजात दर्जा मिळाल्याचं सार्थक झालं असं म्हणता येईल. मराठी युवकांना नोकरीच्या अनेक संधी निर्माण होतील आणि त्यांना खऱ्या अर्थाने सुगीचे दिवस आले असं म्हणता येईल.

❑❑❑

आम्ही मराठी

IMPACT
9.45
iijif
FACTOR

ISSN 2319 9318

***Publisher & Owner***
Archana Rajendra Ghodke
**H**arshwardhan **P**ublication Pvt.Ltd.
At.Post.Limbaganesh, Tq.Dist.Beed-431 126
**(Maharashtra) Mob.09850203295**
E-mail: vidyawarta@gmail.com
**www.vidyawarta.com**